दाखल तारीख — ०१/०१/२०१८
नोंदणी तारीख — ०१/०१/२०१८
निकाल तारीख — ०३/०४/२०१९
कालावधी — ०१व.०३म.०२दि.

**कल्याण येथील प्रथम वर्ग न्यायदंडाधिकारी, सातवे न्यायालय, कल्याण, जि.ठाणे यांचे न्यायालयात.**
(पिठासीन अधिकारी आर.पी.शिंदे)

<u>संक्षिप्त फौजदारी खटला क्र.१/२०१८</u>
CNR NO.MHTH10-000010-2018
**नि.क्र.१६**

**श्री.गोविंद पालो गिरा,**
वय : ६२ वर्षे, धंदा — सेवानिवृत्त,
रा.वाघेरापाडा, कल्याण मुरबाड रोड,
पो.वरप (कांबा), ता.कल्याण,
जि.ठाणे. **... फिर्यादी**

**विरूध्द**

**प्रमोद राजाराम पाटील,**
वय — सज्ञान, धंदा — व्यापार,
रा.राम मंदिरजवळ, जय मल्हार चौक,
मांडा, टिटवाळा (प.) ता.कल्याण
जि.ठाणे. **... आरोपी**

..........................................................................................

फिर्यादीतर्फे वकील : श्री.ए.एन.शेळके.
आरोपीतर्फे वकील : श्री.आर.व्ही.मोरे.

..........................................................................................

# <u>न्यायनिर्णय</u>

( दिनांक ०३/०४/२०१९ रोजी घोषित)

आरोपीविरूध्द चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये गुन्हा तोहमत आहे.

फिर्यादी पक्षाची थोडक्यात हकीकत अशी की,

२) फिर्यादी यांना राहण्यासाठी घराची आवश्यकता होती. फिर्यादीस साई कृष्णाई एटंरप्रायजेस ही भागिदारी संस्था टिटवाळा येथे आरोपीच्यावतीने आरोपीच्या मालकीच्या मौजे मांडा, ता.कल्याण, जि. ठाणे येथे सर्व्हे नं.१३४/२ या मिळकतीवर करण्यात येणा—या चाळीतील रूम कामी रक्कम स्विकारत असल्याचे फिर्यादीस समजले. त्यामुळे फिर्यादी यांनी सदर भागिदारी संस्थेचे भागिदार विनोद विशे व आरोपी यांची भेट घेउन ४८० चौ.फुट क्षेत्रफळाची रूम रक्कम रू. ८,७५,०००/— मध्ये खरेदी करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे फिर्यादीने आरोपीस रू.५,७५,०००/— दिलेले आहेत.

३) परंतु दरम्यानच्या काळात आरोपी यांनी सदर रूम ही ति—हाईत इसमास विक्री केली. त्यामुळे आरोपीने फिर्यादीची घेतलेली रक्कम रू.५,७५,०००/— परत देण्याचे मान्य केले. सदर रक्कम परतफेडीसाठी आरोपीने फिर्यादीस धनादेश क्र.००००६१, रू. २,००,०००/— दि.१५/०७/२०१७, धनादेश क्र.००००६२, रू. २,००,०००/—, दि.१५/०८/२०१७ व धनादेश क्र.००००६३, रू. १,७५,०००/—, दि.१५/०९/२०१७ असे दिले.

४) सदर धनादेशापैकी धनादेश क्र.००००६३ हा फिर्यादीने आरोपीच्या सांगण्यावरून त्याचे बॅंक खातेमध्ये वटण्यासाठी दि. १५/११/२०१७ रोजी जमा केला असता तो ‘फंड्स इनसफिशियंट’ या

शे—याने दि.१६/११/२०१७ रोजी न वटताच परत आला.

५) फिर्यादीने त्याच्या वकीलांमार्फत रक्कम मागणीची नोटीस दि. २९/११/२०१७ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविली व सदरची नोटीस आरोपीला दि.०२/११/२०१७ रोजी मिळुनही तेथून पुढे १५ दिवसांचे कालावधीमध्ये त्याने धनादेशांची रक्कम न दिल्याने फिर्यादीने प्रस्तूत फिर्याद दाखल केली आहे.

६) या न्यायालयाने नि.क्र.१० अन्वये आरोपीचे प्रतिकथन नोंदविले. आरोपीने गुन्हा नाकबूल करून न्यायालयासमोर कामकाज चालविणेची तयारी दर्शविली. फौजदारी प्रक्रीया संहिता कलम ३१३(१)(ब) अन्वये आरोपीचा जबाब नि.१५ वर नोंदविण्यात आला. त्यामध्ये आरोपीने खोटी केस केली असल्याचे कथन केले आहे.

७) फिर्यादीचे कथन व पुरावा तसेच दोन्ही वकीलांचा तोंडी युक्तिवाद लक्षात घेता खालील मुद्दे उपस्थित झाले असून त्यावर मी माझे मत कारणमिमांसेसहित नोंदविले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| १. | आरोपीने फिर्यादीस धनादेश क्र.००००६३, दि. १५/०९/२०१७, रू.१,७५,०००/— बॅक ऑफ बडौदाचा कायदेशिर दायित्वापोटी दिल्याचे व तो अनादरीत झाल्याचे फिर्यादी शाबीत करतो काय ? | ...नाही. |
| २. | आरोपीने चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम ११८(अ) व १३९ मधील गृहितकांचे खंडन केले आहे काय? | ...होय. |
| ३. | आरोपीने चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये गुन्हा केला आहे काय? | ...नाही. |

४. आदेश कोणते? ...आरोपीस निर्दोष मुक्त करण्यात आले.

## :कारणमिमांसा:

८) फिर्यादीने त्याचे पुराव्याचे शपथपत्र नि.१३ वर दाखल केले आहे. फिर्यादीने त्याचा पुरावा संपल्याची पुरसिस नि.१४ वर दाखल केली आहे. आरोपीने सदर कामी कोणताही तोंडी अथवा कागदोपत्री पुरावा दाखल केला नाही.

**मुद्दा क्रमांक १ ते ३ करिता :**

९) मुद्दे क्रमांक १ ते ३ बाबत सारखा पुरावा असल्याने व ते एकमेकांशी संलग्न असल्याने त्याबाबतची पुनरावृत्ती टाळण्यासाठी मी या मुद्दयांचे विश्लेषण एकत्रितपणे देत आहे. फिर्यादीने आपली केस शाबीत करणेसाठी नि.क्र.१३ वर त्याचे पुराव्याचे शपथपत्र दाखल केले आहे व फिर्यादीतील मजकुराची पुनरावृत्ती केली आहे. त्याच्या पुराव्यात त्याने असे कथन केले आहे की, त्यांना राहण्यासाठी घराची आवश्यकता होती. त्यास साई कृष्णाई एटंरप्रायजेस ही भागिदारी संस्था टिटवाळा येथे आरोपीच्यावतीने आरोपीच्या मालकीच्या मौजे मांडा, ता.कल्याण, जि.ठाणे येथे सर्व्हे नं. १३४/२ या मिळकतीवर करण्यात येणा—या चाळीतील रूम कामी रक्कम स्विकारत असल्याचे समजले. त्यामुळे त्याने सदर भागिदारी संस्थेचे भागिदार विनोद विशे व आरोपी यांची भेट घेउन ४८० चौ.फुट क्षेत्रफळाची रूम रक्कम रू.८,७५,०००/— मध्ये खरेदी करण्याचे ठरवले. त्याप्रमाणे त्याने आरोपीस रू.५,७५,०००/— दिलेले आहेत.

१०) पुढे त्याच्या पुराव्यात त्याने असे कथन केले आहे की,

दरम्यानच्या काळात आरोपी यांनी सदर रूम ही ति—हाईत इसमास विक्री केली. त्यामुळे आरोपीने त्याची घेतलेली रक्कम रू.५,७५,०००/— परत देण्याचे मान्य केले. सदर रक्कम परतफेडीसाठी आरोपीने त्यास धनादेश क्र. ००००६१, रू.२,००,०००/— दि.१५/०७/२०१७, धनादेश क्र. ००००६२, रू.२,००,०००/—, दि.१५/०८/२०१७ व धनादेश क्र. ००००६३, रू.१,७५,०००/—, दि.१५/०९/२०१७ असे दिले.

११) पुढे त्याच्या पुराव्यात त्याने असे कथन केले आहे की, सदर धनादेशापैकी धनादेश क्र.००००६३ हा त्याने आरोपीच्या सांगण्यावरून त्याचे बॅक खातेमध्ये वटण्यासाठी दि.१५/११/२०१७ रोजी जमा केला असता तो 'फंड्स इनसफिशियंट' या शे—याने दि.१६/११/२०१७ रोजी न वटताच परत आला.

१२) पुढे त्याच्या पुराव्यात त्याने असे कथन केले आहे की, त्याने त्याच्या वकीलांमार्फत रक्कम मागणीची नोटीस दि.२९/११/२०१७ रोजी रजिस्टर पोस्टाने पाठविली व सदरची नोटीस आरोपीला दि.०२/११/२०१७ रोजी मिळुनही त्याने धनादेशाची रक्कम दिली नाही.

१३) फिर्यादीने त्याच्या उलटतपासामध्ये आरोपीने संपूर्ण रक्कम त्यास परत केल्याचे मान्य केले आहे. तसेच आरोपीकडुन रक्कम येणे नसल्याचे मान्य केले आहे. तसेच आरोपीबद्दल तक्रार नसल्याचे मान्य केले आहे. तसेच पुढे त्याने खोटी केस केल्याचे नाकारले आहे.

१४) फिर्यादीच्या विद्वान वकीलांनी असा युक्तीवाद केला की, आरोपी हा फिर्यादीला कायदेशिर देणे लागत असल्याचे फिर्यादीने शाबीत केले आहे. फिर्यादीने आरोपीला कायदेशिर नोटीस पाठवून व ती आरोपीस मिळुन देखील आरोपीने धनादेशाची रक्कम परत केली नाही. त्यामुळे आरोपीने चलनक्षेम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये गुन्हा केला आहे.

याउलट आरोपीचे विद्वान वकीलांनी असा युक्तीवाद केला की, आरोपी हा फिर्यादीस कायदेशिर देणे लागतो ही बाब फिर्यादीने शाबीत केली नाही. फिर्यादीने आरोपी त्यास देणे लागत नसल्याचे त्याच्या उलटतपासादरम्यान मान्य केले आहे. त्यामुळे आरोपीने चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये गुन्हा केल्याचे फिर्यादीने शाबीत केले नाही.

१५) चलनक्षेम दस्तऐवज कायदयाचे कलम १३८ प्रमाणे गुन्हा शाबीत करण्यासाठी फिर्यादीने प्रथम दर्शनी केस शाबीत केली पाहीजे व त्यानंतर सदर कायदयामधील कलम १३९ व ११८(अ) मधील गृहितकांचा आधार फिर्यादीस घेता येतो. अभिलेखावर उपलब्ध असलेल्या पुराव्याचे व दोन्ही बाजूच्या युक्तीवादाचे अवलोकन केले असता तसेच चलनक्षेम दस्तऐवज कायदयातील तरतुदींचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, प्रस्तुत प्रकरणामध्ये आरोपी हा फिर्यादीस कायदेशिर देणे लागत असल्याबद्दलचा व आरोपीने वादातील धनादेश फिर्यादीला सदर रकमेच्या परतफेडीसाठी दिल्याचे फिर्यादीने शाबीत केले नाही. तसेच फिर्यादीने त्याच्या उलटतपासादरम्यान आरोपीने पैसे परत दिल्याचे मान्य केले आहे व आरोपी फिर्यादीस पैसे देणे लागत नसल्याचे मान्य केले आहे. त्यामुळे फिर्यादीने प्रथम दर्शनी केस शाबीत केली नाही. त्यामुळे फिर्यादीस सदर गृहितकांचा आधार घेता येणार नाही.

१६) आरोपीने चलनक्षेम दस्तऐवज कायदा कलम ११८(अ) व १३९ मधील गृहितकांचे खंडण करण्यासाठी स्वतंत्र पुरावा देण्याची आवश्यकता नाही. आरोपी उपलब्ध पुराव्यावरून व फिर्यादीच्या उलटतपासादरम्यान आलेल्या कबुलीवरून सदर गृहितकांचे खंडण करू शकतो. प्रस्तुत प्रकरणामध्ये फिर्यादीने आरोपीकडुन पैसे परत मिळाल्याचे मान्य केले आहे व आरोपी हा त्याला पैसे देणे लागत नसल्याचे देखील मान्य केले आहे. सबब, आरोपीने सदर गृहितकांचे खंडण केले आहे. सबब, फिर्यादीने प्रथम दर्शनी केस शाबीत केली नसल्याने व आरोपीने

सदर कायदयातील गृहितकांचे खंडण केले असल्याने मी मुद्दा क्र.१ व ३ चे उत्तर नकारार्थी व मुद्दा क्र.२ चे होकारार्थी नोंदवत आहे.

**<u>मुद्दा क्रमांक.४ करीता :—</u>**

१७) फिर्यादीने त्याची केस दाखल व उपलब्ध पुराव्यावरून शाबीत केली नाही. तसेच आरोपीने चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३९ व ११८(अ) मधील गृहितकांचे खंडण केले आहे. त्यामुळे चलनक्षेम दस्तऐवज कायदा कलम १३८ मधील मुलभूत बाबीं फिर्यादी शाबीत करू शकला नाही. त्यामुळे आरोपीस सदर प्रकरणी दोषी धरता येणार नाही. अशा परिस्थितीत संशयाचा फायदा हा आरोपीचे पक्षात जातो व त्यामुळे आरोपीला चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ च्या तरतूदींच्या अंतर्गत दोषी धरणे योग्य होणार नाही. सबब त्यास या दोषातून निर्दोष मुक्त करणे न्यायोचित होणार आहे. सबब, मी मुद्दा क्रमांक ४ चे पृष्टयर्थ खालील आदेश करीत आहे.

**: <u>आ दे श</u> :**

१) आरोपी प्रमोद राजाराम पाटील यांना चलनक्षम दस्तऐवज कायदा कलम १३८ अन्वये गुन्हा केल्याच्या आरोपातून फौजदारी प्रक्रिया संहिता कलम २५५(१) अन्वये निर्दोष मुक्त करण्यात येत आहे.

२) आरोपीने दिलेला वैयक्तीक जात मुचलका रद्द करण्यात येत आहे.

३) आरोपीने फौजदारी प्रकिया संहिता कलम ४३७—अ अन्वये रक्कम रु.१५,०००/—चा वैयक्तीक व जामीनदाराचा जातमुचलका दयावा.

—— न्यायनिर्णय खुल्या न्यायालयात जाहीर केला.

सही/—<br>
(आर.पी.शिंदे)<br>
न्यायदंडाधिकारी (प्रथम वर्ग),<br>
७वे न्यायालय, कल्याण.

कल्याण.<br>
दिनांक : ०३/०४/२०१९